Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj's
# SHRI DHOKESHWAR COLLEGE
• Takali Dhokeshwar, Tal. Parner, Dist. Ahmednagar, Maharashtra, Pin - 414304 • Office(02488) 282414

NAAC
B++ Grade

Id. No. PU/AN/047/1994
Email- tdcollege@gmail.com
Website: www.shridhokeshwarcollege.com

Principal Dr. Rangnath Aher
M.Sc.,Ph.D., F.H.A.S., F.I.S.S.T.
Mob. 9422754080

# Report of the National Conference

## *"Frontiers of Sustainable Development in Science and Environment"*

(Saturday, February 24, 2024)

The National Conference "Science and Environment Frontiers of Sustainable Development" was organized by the Science Branch of Ahmednagar Jilha Maratha Vidya Prasarak Samaj, Shri Dhokeshwar College, Takli, Dhokeshwar on Saturday, February 24, 2024. The response to this conference was very enthusiastic. The Senior Trustee of the organization, Hon. Deeplakshmi Mhase Patil, was present as the inaugurator of the conference. While Hon. Shri Sitaram Patil Khilari, Senior Trustee of the organization, was present as the chairman. Hon. Dr. Ajay Thube, who is working as the Vice-Chancellor at Savitribai Phule Pune University, Pune, was invited for this conference. The inauguration ceremony of the program started at exactly 10:30 am and was completed on time.


A total of three lecturers were invited for the conference. In this, Dr. Kiran Kumar Johare, who is known as an electronic and meteorological scientist from K.T.H.M. College, Nashik, Prof. Dilip Thube, Vice Principal of Science and Head of Chemistry Department at New Arts Commerce and Science College, Ahmednagar, and Prof. Balasaheb Gaiker, Botany from Ahmednagar College, Ahmednagar, guided the attendees very well. A total of 117 professors from Pune University, 14 from Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Sambhajinagar, 5 from Rashtrasant Tukdoji Maharaj University, Nagpur, 6 from Mumbai University, 4 from Shivaji University, Kolhapur, 3 from Swami Ramanand Tirth Marathwada University, Nanded, had registered their names online for the conference. A total of 32 research students and 35 students from outside colleges had registered.

The participating professors were invited for abstracts of research papers for the conference. This also received a very good response and a total of 98 abstracts were received. The said abstract was published in PDF form by the dignitaries at the inaugural program of the conference. Paper presentations were held in the programs. A total of 20 professors participated in this. The first three positions were drawn. The first position was won by Prof. Trupti Barve, the second position by Prof. Pushpa Ghogare and the third position by Prof. Popat Pathare. Tea, breakfast and food were arranged by the college for the dignitaries present at the conference. The coordinator of the conference was Prof. Namdev Walhekar, the head of the department. The program was concluded in the presence of Honorable Principal Dr. Rangnath Aher and Dr. Dilip Thube. The professors, non-teaching staff and students of the college provided invaluable cooperation to the conference.

Walhekar
Walhekar N.M.

PRINCIPAL
Shri Dhokeshwar College
Takali Dhokeshwar
Tal Parner, Dist.Ahmednagar

Scanned with OKEN Scanner





पुण्य नगरी

# शाश्वत संशोधनासाठी दृष्टिकोन महत्वाचा : अॅड. म्हसे



टाकळी ढोकेश्वर : शाश्वत संशोधनासाठी दृष्टिकोन महत्वाचा असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाज संस्थेच्या विश्वस्त अॅड. दीपलक्ष्मी म्हसे पा. यांनी केले.

श्री ढोकेश्वर महाविद्यालयात 'विकासाची क्षितिजे' या विषयावर आयोजित राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी सर होते. प्रमूख पाहुणे म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे उपकुल सचिव डॉ. अजय ठुबे उपस्थित होते.


पुढे बोलताना म्हसे यांनी, देशातील हरित न्यायालयाचा अहवाल, देशातील जैविक हानी व कचऱ्याचे व्यवस्थापन आदी समस्या मांडल्या. पर्यावरण समस्यांवर चांगले संशोधन झाले तरच देशाचे भविष्य उज्वल असणार आहे. पर्यावरणाची समस्या सोडविणे व विज्ञानातून शाश्वत विकास लोकांपर्यंत पोहोचवण्याचे काम शिक्षकांनी करावे, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. अजय ठुबे यांनी आपल्या भाषणात जागतिक पर्यावरण समस्या व वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेणे, आणि त्यावर संशोधन करून अंमलबजावणी करणे हीच काळाची गरज असल्याचे सांगितले. हवामान तज्ज्ञ किरण कुमार जोहरे यांनी मानवाने तंत्रज्ञानाचा वापर सकारात्मक करावा. मानवाच्या विकासाठी वैज्ञानिक चांगला हेतू ठेवतात ; परंतु चुकीच्या लोकांनी विज्ञानातील शोधांचा गैरवापर केल्याने संपूर्ण जगाला धोका निर्माण केला असल्याचे सांगितले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी केले. या वेळी डॉ. डी. आर. ठुबे यांनी मार्गदर्शन केले. परिषद यशस्वीतेसाठी उपप्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी, प्रा. नामदेव वाल्हेकर, प्रा. शैलजा टिंगरे, डॉ. विजय सुरोशी, प्रा. सविता पिंगट, तसेच सर्व शिक्षक, शिक्षेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. जीजाभाऊ घुले यांनी केले. प्रा. संजय गायकवाड यांनी आभार मानले.


Smart Ahmednagar Edition
Feb 27, 2024 Page No. 04
Powered by: erelego.com

Walhekar
Walhekar N.M.

PRINCIPAL
Shri Dhokeshwar College
Takali Dhokeshwar
Tal Parner, Dist.Ahmednagar

Scanned with OKEN Scanner



# संशोधनासाठी मानवतावादी दृष्टिकोन महत्त्वाचा

## हवामानतज्ज्ञ प्रा. जोहरे यांचे प्रतिपादन

**लोकनामा प्रतिनिधी**



**करंजी खुर्द :** मानवाच्या विकासासाठी वैज्ञानिक चांगला हेतू ठेवतात, परंतु चुकीच्या लोकांनी विज्ञानातील शोधांचा गैरवापर करून संपूर्ण जगाला आज धोका निर्माण केला आहे. संशोधक विद्यार्थ्यांनी आपल्या संशोधनातून राष्ट्राचे व मानवजातीचे कल्याण होईल अशा मानवतावादी दृष्टिकोनातून शाश्वत विकास करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन हवामानशास्त्रज्ञ व मविप्र समाज संस्थेच्या महाविद्यालयातील प्रा. किरणकुमार जोहरे यांनी केले.

श्री ढोकेश्वर महाविद्यालयात विज्ञान आणि पर्यावरणातील विकासाची क्षितिजे या विषयावर राष्ट्रीय परिषदेच्या पहिल्या सत्रात ते मार्गदर्शन करत होते. एआय तंत्रज्ञानाने नवीन रोजगार निर्माण होत आहेत. काम करण्यासाठी दहा कोटींपेक्षा जास्त रोजगार उपलब्ध आहेत. मात्र, एआयमुळे सर्व नोकऱ्या जातील अशी भीती फक्त कामचुकार व आळशी लोकांसाठी आहे, असेही ते म्हणाले. यावेळी उपस्थितांनी संशोधन कार्यपद्धती व घ्यावयाची आवश्यक काळजी याबद्दल, तसेच रिसर्च पेपर प्रकाशन आदींबाबत विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे प्रा. जोहरे यांनी दिली. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त सीताराम खिलारी अध्यक्षस्थानी होते.

प्राचार्य डॉ. रंगनाथ आहेर यांनी प्रास्ताविक केले. परिषद यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य वीरेंद्र धनशेट्टी, समन्वयक प्रा. नामदेव वाल्हेकर, सहसमन्वयक प्रा. शैलजा टिंगरे, कला शाखाप्रमुख डॉ. विजय सुरोशी, प्रा. सविता पिंगट यांनी परिश्रम घेतले. प्रा. डॉ. जिजाभाऊ घुले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संजय गायकवाड यांनी आभार मानले.

Walheka N.M.

PRINCIPAL
Shri Dhokeshwar College
Takali Dhokeshwar
Tal Parner, Dist.Ahmednagar

Scanned with OKEN Scanner